चंद्रपूर जिल्हा पोलीस वार्तापत्र
कार्यालय पोलीस अधीक्षक, चंद्रपूर
Email : sp.chandrapur@gmail.com, sp.chandrapur@mahapolice.gov.in
२८ एप्रिल, २०१९
☎ : 07172-264300
: 07172-255800
: 7276494810 (PRO)

# राजुरा पोलींसानी काही तासातच खुनाचा गुन्हा केला उघड

दिनांक २९/०४/२०१९ रोजी फिर्यादी नामे रवि देवदास ठाकुर वय ४० वर्ष रा. इंदीरानगर वार्ड राजुरा, त्यांचा १६ वर्षाचा मुलगा संदेश ठाकुर हा दिनांक २८/०४/२०१९ रोजी रात्री ०८:३० वाजता दरम्यान घरी कोणाला काही न सांगता निघुन गेला. दिनांक २९/०४/२०१९ रोजी सकाळी घराशेजारी राहणारे युसुफ याने माहिती दिली की, संदेश सारखाच दिसणारा मुलगा शिवाजी कॉलेज येथील मैदानावर मृतावस्थेत पडुन आहे. यावरून फिर्यादी रवि ठाकुर यांनी मैदानावर जावुन खात्री केली तर त्यांचा मुलगा संदेश हा मृतावस्थेत पडुन होता व त्याचे शरीरावर व गळयावर मार लागल्याचे दिसुन येताच यांनी राजुरा पोलीस स्टेशन येथे तक्रार दाखल केली. पोलीसांनी तात्काळ प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेता, अप.क्र. २०८/२०१९ कलम ३०२ भादंवि अन्वये गुन्हा नोंदवुन तपासास सुरूवात केली.

पोलसांनी तात्काळ घटनास्थळ गाठुन बारकाईने तपास करीत वेगवेगळया पदध्तीने माहिती घेत तसेच फिर्यादीने दाखविलेल्या संशयावरून आरोपीबाबत माहिती काढण्यास सुरूवात केली. पोलीस सदर घटनेचा तपास करीत असतांना विचारपुस दरम्यान माहिती समोर आली की, फिर्यादी रवि ठाकुर यांचे घरी राकेश उर्फ बाल्या मुर्लीधर वाघमारे रा. इंदीरा नगर राजुरा हा इसम आला होता व त्याने फिर्यादी यांचे सोबत वादविवाद केला. या संशयावरून पोलीसांनी तपासाचे चक्र गतीमान करीत राकेश उर्फ बाल्या यास बारकाईने विचारपुस केली असता निष्पन्न झाले की, राकेश याचे ओळखीची महिला हिच्या भाची सोबत संदेश ठाकुर याचे प्रेमसंबध असल्याचा संशय आल्याने मनात राग धरून राकेश उर्फ बाल्या याने संदेश यास ठार केले. असे निष्पन्न होताच पोलीसांनी राकेश उर्फ बाल्या मुर्लीधर वाघमारे रा. इंदीरा नगर राजुरा यास अटक केली आहे. पुढिल तपास राजुरा पोलीस करीत आहे.

सदरची कार्यवाही मा. पोलीस अधीक्षक चंद्रपुर, श्री. महेश्वर रेड्डी यांचे मार्गदर्शनात, उपविभागीय पोलीस अधिकारी राजुरा श्री. शेखर देशमुख, यांचे नेतृत्वात पोलीस स्टेशन राजुरा प्रभारी पोनि. गायगोले. यांचे सह सपोनि. सुनिल झुरमुरे व राजुरा पोलीस स्टेशन येथील पोलीस पथकाने पार पाडली.